REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख ७ डिसेंबर, १९३८ अंक ४८

सर्वांगीण प्रगति
सन १९३७ भक्कम भरभराटीचें वर्ष

## वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड
सातारा शहर

१९३८ अखेर
आठवें मूल्यमापन
आणि
रौप्य महोत्सव

त्रैवार्षिक बोनस
हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०
कोणत्याही दृष्टीनें पहा
वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.
पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.

स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन
त्याचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी
लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.
ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.
रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंट.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

# विविध माहिती

**मुंबई-सिंध रेल्वे योजना**

मुंबई-सिंध रेल्वे योजनेस ५ कोटि, ५२ लक्ष रुपये खर्च येईल असा रेल्वे बोर्डाचा अंदाज आहे. कराची येथील कांहीं व्यापारी संस्थांनीं एक योजना आखली आहे. तिच्याप्रमाणें वरील रकमेपेक्षा १ कोटि, ८० लक्ष रुपये खर्च कमी लागेल. रेल्वे बोर्डाच्या अंदाजाप्रमाणें गुंतविलेल्या भांडवलावर २.२% व्याज सुटेल; व्यापारी संस्थांच्या वरील हिशेबाप्रमाणें ३.५% व्याज पडेल. ही योजना रेल्वे बोर्डास सादर करण्यांत येणार आहे.

**मुंबई येथील क्लिअरिंग हौसमधील चेक्सची देवघेव**

२५ नोव्हेंबर रोजीं संपलेल्या आठवड्यांत मुंबईच्या क्लिअरिंग हौसमध्यें ९ कोटि ८३ लक्ष रुपये किंमतीच्या ८५,८९० चेक्सची उलाढाल झाली.

**खात्यांची पुनर्रचना**

मुंबई सरकारच्या मंत्रिमंडळाच्या हातांतील खात्यांची फेरवाटणी होऊन त्यांतून ग्रामसुधारणा खातें निर्माण होणार आहे आणि तें सध्याचे फडनवीस, ना. लठ्ठे, ह्यांजकडे येणार आहे. सध्याच्या तीन पैकीं एका कमिशनरकडे ह्या खात्याची व्यवस्था सोपविण्यांत येईल. शेती, सरकार, ग्रामसुधारणा, कर्जाची तडजोड, सर्वसाधारण ग्रामोन्नति इत्यादि बाबी आतां ना. लठ्ठे ह्यांच्या खात्यांत समाविष्ट होतील.

**म्यूझियमची वाढती लोकप्रियता**

मुंबई येथील राणीच्या बागेंतील म्यूझियमला गेल्या वर्षी १३½ लक्ष लोकांनीं भेट दिली. हा आकडा त्या पूर्वीच्या सालविषयक आकड्यापेक्षा ३¾ लक्षांनीं मोठा आहे. हा म्यूझियम पहाण्यास दररोज सरासरीनें ४½ हजार लोक जातात. गेल्या वर्षी ३ नोव्हेंबर रोजीं १७,३५७ लोकांनीं म्यूझियम पाहिला.

**मुंबईचा परराष्ट्रीय व्यापार**

ऑक्टोबर, १९३८ मध्यें मुंबईच्या परराष्ट्रीय व्यापाराची किंमत १० कोटि, ३७ लक्ष रुपये भरली. ५ कोटि, ३३ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची आयात झाली आणि २ कोटि, ५७ लक्ष रुपये किंमतीचा माल बाहेर गेला. २½ लक्ष रुपयांचें सोनें व २३½ लक्ष रुपयांची चांदी ह्यांची आयात झाली आणि १ कोटि, ८६ लक्ष रुपयांचें सोनें आणि १२ हजार रुपयांची चांदी ह्यांची निर्गत झाली. सुमारें ३५½ लक्ष रुपयांचा माल आयात होऊन पुनः परदेशी रवाना झाला.

**कारखान्यांतील अपघात**

१९३७ सालीं मुंबई प्रांतांतील कारखान्यांमधील ८,२०६ अपघात नोंदले गेले.

**धूम्रपान करणाराकडून अप्रत्यक्ष कराचें उत्पन्न**

ग्रेट ब्रिटनमधील धूम्रपान करणारा प्रत्येक नागरिक दरसाल अप्रत्यक्ष कराचे रूपानें सरकारास सुमारें ५० रुपये भरतो.

**दीड लाख परिचारिका**

ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण १½ लक्ष परिचारिका आहेत आणि त्या दरसाल ८० लक्ष रुग्णांची शुश्रूषा करतात.

**ट्रेझरी बिलांवर १ रु. १० आ. ४ पै व्याजाचा दर**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं तीन महिने मुदतीचीं २½ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १० आ. ४ पै इतका पडला.

**अकोट संपत्ती आणि तिचा सदुपयोग**

अमेरिकेंतील प्रसिद्ध कोट्याधीश दिवंगत जॉन डी. रॉक्फेलर, ह्यांनीं आपल्या मागें ७ कोटि रुपयांची मालमत्ता ठेविली आहे. त्यांनीं आपल्या हयातींत सुमारें १३५ कोटि रुपयांचा दानधर्म केला.

**रॉथशिल्ड घराण्याची अफाट संपत्ती**

रॉथशिल्ड ह्या जगप्रसिद्ध ज्यूइश धनिक घराण्यानें गेल्या शंभर वर्षांत एकूण सुमारें ५२५ कोटि रुपयांची संपत्ति मिळवली.

**मोटारींची संख्या**

प्रत्येक ४८ लोकवस्तीशीं १ मोटार असें जागतिक प्रमाण पडतें.

**न्यूयॉर्क येथील प्रचंड प्रदर्शन**

येतें आंतरराष्ट्रीय मोठें प्रदर्शन न्यूयॉर्क येथें १९३९ सालीं भरेल. वेंब्ले येथील ब्रिटिश साम्राज्य प्रदर्शनाचे मानानें तें साडेपांच पट मोठें होईल अशी अपेक्षा आहे.

**खोटीं बोलावणीं**

गेल्या वर्षी लंडन येथील आगीच्या बंबांस बोलावणीं आलीं, त्यांपैकीं १६७४ बोलावणीं खोटीं ठरलीं.

**अमेरिकेचा सुवर्णसंचय**

चलनाचा आधार म्हणून साठवून ठेवलेल्या अमेरिकन सुवर्णनिधीची किंमत सुमारें ३,८०० कोटि रुपये आहे. झेकोस्लाव्हेकिअन प्रकरणामुळें माजलेल्या गडबडींत पांच आठवड्यांच्या अवधींत युरोपांतून अमेरिकेकडे लोकांनीं सोनें पाठवून दिलें, त्या कारणानें ह्या सुवर्णनिधींत सुमारें २१० कोटि रुपये किंमतीच्या सोन्याची भर पडली

**हिंदुस्थानांतील फ्रेंच मुलुखांत डोईपट्टी**

हिंदुस्थानामधील फ्रेंच मुलुखामध्यें फ्रेंचांखेरीज इतर सर्वांवर डोईपट्टी बसविण्यांत येणार आहे. तेथील हिंदी लोकांस अर्थातच हा कर भरावा लागेल.

**पोस्टाच्या तिकिटांचा खप**

१९३७-३८ मध्यें सबंद हिंदुस्थानांत मिळून ६ कोटि, ९१½ लक्ष रुपये किंमतीचीं पोस्टाचीं तिकिटें खपलीं. सरकारी कामासाठी १ कोटि, ४ लक्ष रुपयांचीं तिकिटें लागलीं.

**तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत विजेचे पंखे**

आगगाड्यांमधील तिसऱ्या वर्गाच्या सर्व डब्यांतून विजेचे पंखे बसविण्यास २ कोटि रुपये खर्च पडेल आणि त्यांस चालू खर्च सालिना ३० लक्ष रुपये येईल, अशी माहिती सर टॉमस स्टुअर्ट ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीमध्यें सांगितली.

**फायर इन्शुअरन्स असोसिएशनचा पगारी अध्यक्ष**

बॉंबे फायर इन्शुअरन्स असोसिएशन आपल्या अध्यक्षाचे जागीं एका पगारी मनुष्याची नेमणूक लवकरच करणार आहे. ह्या जागेकरितां सर विल्यम शार्प, सर साजबा रांगणेकर, सर गोविंदराव प्रधान, मि. फाझल रहिमतुल्ला इत्यादींचे अर्ज आले आहेत.

**चांदीची निर्गत**

३ डिसेंबर रोजीं संपलेल्या आठवड्यांत मुंबई बंदरांतून लंडनकडे ३ लक्ष ८२½ हजार औंस चांदी निर्गत झाली.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | किंमत रुपये |
|---|---|
| २०–११–३८ ते २६–११–३८ | ९,४९,८७३ |
| २७–११–३८ ते ३–१२–३८ | निर्गत झाली नाहीं. |
| २१–९–३१ ते ३–१२–३८ | ३,१७,५१,२४,८२७ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ५९५ |
| २ हिंदी रेल्वेज आणि त्यांचें गिऱ्हाइक | ५९५ |
| ३ चेक्सचे व्यवहाराबाबत एक महत्त्वाचा निवाडा | ५९६ |
| ४ महाराष्ट्रांतील साखरेचे कारखाने | ५९६ |
| ५ स्फुट-विचार | ५९७ |
| विमा कायद्याखालील नियमांचा मसुदा—बँकांच्या कर्जविषयक धोरणांत बदल करण्याचा सल्ला—कॉमनवेल्थ कंपनीचें तृतीय मूल्यमापन—कपाशीचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता—फेडरल कोर्टाचा निवाडा—इनकमटॅक्स बिलाची प्रगति | |
| ६ मोटार सारथ्यांचें आणि पादचारी लोकांचें आत्मसंरक्षण | ५९९ |
| ७ सहकारी जनतेस विनंति | ६०० |
| ८ महाराष्ट्र विमा कं. लि. | ६०० |
| ९ शेतीच्या मालाच्या उठावांत सुधारणा | ६०१ |
| १० डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि. | ६०२ |
| ११ प. खा. जिल्हा इन्स्टिट्यूट | ६०२ |
| १२ एका नमुनेदार खेडेगावाचें दृश्य | ६०३ |
| १३ निवडक बाजारभाव | ६०३ |



# अर्थ

बुधवार, ता. ७ डिसेंबर, १९३८


## हिंदी रेलवेज आणि त्यांचें गिऱ्हाइक

इंडियन रेल्वे परिषदेचें वार्षिक अधिवेशन दिल्ली येथें नुकतेंच पार पडलें. त्यावेळीं परिषदेचे अध्यक्ष, ईस्टर्न बेंगॉल रेल्वेचे एजंट आणि जनरल मॅनेजर, मि. ए. एफ. हार्वे, ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदी रेलवेजसंबंधीं कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचा उहापोह केला. आगगाड्या आणि मोटार बसेस ह्यांच्या वाढत्या स्पर्धेमुळें रेल्वे कंपन्यांस आपल्या कारभाराकडे जास्त बारकाईनें पहाणें आतां आवश्यक कसें झालें आहे ह्याचें प्रत्यंतर त्यांच्या भाषणांत दिसून आलें. आगगाडींतून प्रवास करणारे उतारू हीं रेल्वेचीं गिऱ्हाइकें आहेत आणि त्या दृष्टीनेंच त्यांच्याशीं रेल्वे नोकरांनीं वागणें आवश्यक आहे, ह्या गोष्टीची जाणीव रेल्वे अधिकाऱ्यांस आतां होऊं लागली आहे. रेल्वे नोकरांनीं उतारूंशीं उर्मटपणानें वागणें हा शिस्तभंग समजला जाईल, असा नियम रेल्वे बोर्ड करणार आहे, असें मि. हार्वे यांनीं सांगितलें. ज्या कामासाठी रेल्वेकडून त्यांस वेतन मिळतें, तें काम करण्याकरितां रेल्वेचे नोकर कित्येक वेळां उतारूंकडून पैसे उकळतात. तथापि, ह्याबाबत लोक तक्रारी करीत नाहींत असा रेलवेजचा अनुभव आहे. रेल्वेच्या नोकरांविरुद्ध तक्रार केल्यास आपली खोटी होऊन नुकसान सोसावें लागेल अशी व्यापाऱ्यांस भीति वाटते आणि ती निराधार आहे असें म्हणतां येणार नाहीं. माल पाठविण्यास पाहिजेत तेव्हां वॅगन्स मिळण्यास अडचण उपस्थित करणें, माल उतरवून घेण्याचे बाबतींत अडथळे आणणें, इत्यादि मार्गांनीं रेल्वे नोकर तक्रार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर सूड घेऊं शकतात आणि व्यापारी लोकांस आपलें नुकसान टाळण्यासाठी रेल्वे नोकरांस खुष ठेवणें परवडतें. तक्रारी करून त्याविषयीं पुरावा देण्यांत होणारा वेळेचा खर्च वांचविण्याची त्यांची प्रवृत्ती असते. तथापि, लोकांचें सहकार्य मिळाल्यास आणि रेलवेजच्या अधिकारीवर्गानें ह्याबाबत कडक धोरण स्वीकारल्यास, रेलवेजवरील पैसे खाण्याचें प्रमाण बरेंच कमी होईल ह्यांत संशय नाहीं. नियमापेक्षा अधिक वजन बरोबर नेणारा उतारू रेलवेच्या कारकुनास बक्षिसी देऊन आपलाहि फायदा करून घेतो आणि रेल्वेचें मात्र निष्कारण नुकसान होतें. रेल्वेचा नफा आपणांस अधिक पगाराचे रूपानें आणि कामाच्या संबंधांतील सुधारणेचे स्वरूपानें परत मिळेल अशी नोकरवर्गाची जोपर्यंत भावना होत नाहीं तोपर्यंत ही रेल्वेचे उत्पन्न बुडविण्याची त्याची प्रवृत्ती नाहींशी होणार नाहीं, हें उघड आहे. रेल्वेचे उतारू तुमच्याशीं उद्धटपणें वागल्यास तात्काळ तक्रार करा, अशी सूचना देणाऱ्या पाट्या रेल्वेजनीं आतां ठिकठिकाणीं लावल्या आहेत. अशा प्रकारें उतारूंना इष्ट असें शिक्षण देण्यांत येत आहे, तें योग्यच आहे.

हिंदी रेल्वेज आपल्या जाहिरातींवर पुरेसा पैसा खर्च करीत नाहींत, अशी मि. हार्वे ह्यांनीं तक्रार केली. नोकरांची भरती, टेंडरांची नोटीस, वेळापत्रकांत फेरफार, इत्यादि कारणांसाठी हिंदी रेल्वेज जाहिराती देतात, परंतु ज्यास्त उतारू मिळविण्यासाठी अगर मालाची वहातुक आकर्षण्यासाठी रेल्वेज करावा तसा यत्न करीत नाहींत, असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या संबंधांतहि सुधारणा होऊं लागली आहे, आणि रेल्वेज देत असलेल्या अनेक सवलती, फिरतीचे प्रवास, आपल्या रस्त्याचे आसपासचीं प्रेक्षणीय स्थळें आणि यात्रेकरितां सफरी इत्यादींचें वर्णन रेल्वेज वर्तमानपत्रांतून करूं लागल्या आहे. झोन तिकिटांमुळें लोकांस प्रवासाची गोडी उत्पन्न झाली आहेत. तथापि, जनतेची आर्थिक परिस्थिति सुधारल्याविना रेल्वेजचें उत्पन्न झपाट्यानें वाढणें कठीण आहे. मोटारी आणि रेल्वेज ह्यांचेमध्यें मालाचे वहातुकीचेबाबत अगर उतारूंच्या दरासंबंधीं स्पर्धा होते, तेथें शक्य तितक्या सवलती देऊन रेलवेज ही वहातुक आपणांकडे ओढून घेण्याचा यत्न करीत आहेत. मोटारींतून प्रवास करण्यापेक्षा तो आगगाडींतून करणें ज्यास्त सुरक्षित आहे, हें अनेक मोटार-अपघातांनीं सिद्ध करून दिलें आहे; ह्या गोष्टीचा रेल्वेजनीं पुरा फायदा करून घेतला पाहिजे. रेलवेजवरहि मोठे अपघात होऊं शकतात, अशी लोकांची कल्पना होण्याजोगी परिस्थिती गेल्या अठरा महिन्यांतील रेल्वे अपघातांनीं निर्माण केली आहे. रेलवेजवरील विश्वास उडून जाऊं नये, ह्यासाठी त्यांनीं योग्य ती खबरदारी घ्यावी लागेल. आगगाडींतील चोऱ्या आणि खून ह्याविषयीं विशेष प्रतिबंधक उपाय योजणें हाहि उतारूंत विश्वास उत्पन्न करण्याचा एक मार्ग आहे.

हिंदुस्थान सरकारच्या वहातुक खात्याचे मंत्री, सर टॉमस स्टुअर्ट, ह्यांनीं आपल्या भाषणांत मि. हार्वे ह्यांच्या मुद्यांसच पुष्टी दिली. परंतु त्याबरोबरच त्यांनीं रेलवेजच्या व्यवहारांत सुधारणा होण्याचे मार्गांतील अडचणीहि पुढें मांडल्या. उतारूंस मिळावयास पाहिजेत त्या सुखसोयी मिळत नाहींत अशी तक्रार आज करणारा टीकाकार उद्यां रेल्वेजवर उधळपट्टीचा आरोप करण्यास चुकणार नाहीं, अशी भीति त्यांनीं व्यक्त केली. उतारूच्या सुखसोयी पहावयाच्या म्हणजे त्यास पैसे पडतात आणि त्यामुळें, सहाजीकच, उत्पन्नाचे मानावर ह्या गोष्टी अवलंबून रहाणार, असा त्यांचा म्हणण्याचा आशय होता. तत्वत: हें म्हणणें मान्य होण्याजोगें आहे, परंतु हिंदी रेलवेज तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे भाड्यापासून उत्पन्न मिळवितात आणि फक्त पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाच्या उतारूंच्याच सुखसोई आणि अडचणी त्यांस दिसतात अशी लोकांची तक्रार आहे, तिला सर टॉमस ह्यांचें काय उत्तर आहे ? हिंदी रेलवेजच्या कारभारामध्यें उच्च आणि कनिष्ठ असा भेदाभेद केला जात नाहीं, अशी लोकांची खात्री

पटवून देण्याची जबाबदारी रेल्वेजवर आहे, आणि ती त्यांनी टाळून भागणार नाहीं. लोकांस उपदेश करण्यापूर्वी स्वतःचा कारभार न्याय्य आणि योग्य मार्गानें चालू आहे काय, असा प्रश्न रेल्वेजनीं स्वतःस विचारला पाहिजे. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंकडून मिळविलेल्या पैशाचा विनियोग त्यांच्या सुखसोईकडेच केला पाहिजे आणि आपल्या नोकर वर्गास रेल्वेजचें हित पहाण्यास आग्रह करण्यापूर्वी त्यांच्यामध्यें रेल्वेजबद्दल आपलेपणा उत्पन्न केला पाहिजे. देशांतील रेल्वेज ही राष्ट्रीय संस्था आहे, असा विश्वास लोकांस वाटावयास नको काय? ह्या संबंधांत ब्रिटिश सरकार आणि हिंदी सरकार ह्यांची भूमिका काय आहे? एकीकडे रेल्वेजचें राखीव खातें निर्माण करून आणि त्यांत विदेशीयांचा भरणा दुसरीकडे करून हिंदी लोकांची सहानुभूति मिळविण्याचा यत्न करणें कठीण आहे हें त्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

## चेक्सचे व्यवहाराबाबत एक महत्त्वाचा निवाडा

इंग्लंडमधील इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स ह्या संस्थेचे अध्यक्ष, मि. वुइल्सन, ह्यांनीं वार्षिक सभेच्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत अलीकडील व्यवहारांत "चेक्स"ना जें विलक्षण महत्त्व प्राप्त झालें आहे त्याचें विवेचन केलें. चेक्स भरणें, वटवणें इत्यादि बाबतींत जे रिवाज रूढ झाले आहेत आणि त्यांचेसंबंधांत कोर्टांनीं जे कायद्याचे निकाल दिले आहेत, त्यांचे योगानें बँकर्सवर कठीण जबाबदारी पडली असल्याचें त्यांनीं सांगितलें. व्यापाऱ्यांनीं आपलें देणें लांबवणें, हिशेबांत देण्या घेण्याबद्दल जमा-नांवें करणें इत्यादि प्रघातांमुळें चेक्सचा प्रसार मर्यादित होण्याचा कितीसा संभव आहे ह्याचें दिग्दर्शनहि त्यांनीं केलें. इतर मार्गांनीं देणींघेणीं भागवण्याच्या प्रघातांचा कितीहि विस्तार झाला तरी चेक्सची लोकप्रियता आणि उपयोग ह्यांची वाढ कमी होण्याचा संभव नाहीं, असें मत त्यांनीं प्रकट केलें. हिंदुस्थानांत चेक्सची पद्धति विस्तार पावण्यास अजून कितीतरी वाव आहे आणि तिची उपयुक्तता वाढती मान्यता पावत आहे. चेक्सच्या देण्याघेण्यांचे बाबतींत बँकर्सना अत्यंत काळजीनें आणि काटेकोरपणानें वागूनहि मोठी जबाबदारी आपल्या शिरावर वागवावी लागते ह्याची जाणीव बँकांत काम करणारांस आणि त्यांच्या चालकांस आहे. कायदा आणि न्यायाधीशांनीं त्यासंबंधांत दिलेले निकाल ह्यांकडे त्यांनीं सारखें लक्ष देणें अगत्याचें आहे.

चेक्सच्या एका व्यवहाराचे बाबतींत इंग्रजी न्यायमंदिरांत एक निकाल नुकताच देण्यांत आला, तो बँकिंगचे व्यवहार करणाऱ्या लोकांचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा असल्यानें त्याविषयींच्या मुख्याच्या गोष्टी आम्हीं येथें देत आहों. कायद्याच्या निरनिराळ्या तत्त्वांचीं सांगड त्यांत कशी घालण्यांत आली आहे आणि तिचे व्यावहारिकदृष्ट्या काय परिणाम होण्यासारखे आहेत ह्याचा विचार बोधप्रद होईल. क्रे हिल ब्रिक टाइल कंपनीकडून रॉलिंग्ज ह्या नांवाचा गृहस्थ विटा खरेदी करीत असे. बार्बर ह्या नांवाचा गृहस्थ कंपनीचा डायरेक्टर असून मॅनेजिंग डायरेक्टर म्हणूनहि काम पहात असे. असें काम त्यानें पहाण्याबाबत औपचारिक रीतीचा ठराव मात्र झालेला नव्हता. बार्बरच्या सांगण्यावरून रॉलिंग्जनें त्याच्या नांवानें चेक काढून कंपनीस यावयाचे पैसे भरले. कंपनीच्या नांवानें चेक काढले काय किंवा व्यक्तिशः मॅनेजिंग एजंटप्रमाणें तिचें काम पहाणाराच्या नांवानें ते काढले काय सारखेंच, अशी त्याची समजूत होती. मिळालेल्या चेक्सचे पैसे बार्बरनें कंपनीच्या खात्यावर जमा केले नाहींत आणि ते आपणांस दिले जावे म्हणून कंपनीनें रॉलिंग्जवर दावा लावला.

"बार्बरनें केलेल्या कृत्याबद्दल कंपनी जबाबदार आहे काय?" असा प्रश्न येथें उपस्थित झाला. कंपनीचा प्रत्येक डायरेक्टर हा तिचा एजंट म्हणून समजला जातो आणि एजंटाच्या कृत्याबद्दल कंपनी जबाबदार रहाते, असा कायदा आहे. कंपनीनें आपल्या एजंटास किती अधिकार दिलेले आहेत हा प्रश्न महत्त्वाचा नसून एजंटाशीं व्यवहार करणारास त्याचे अधिकारासंबंधीं काय ग्रह होईल हा मुद्दा विशेष लागू आहे. रोजच्या व्यवहारांत एजंट ज्या गोष्टी करतो, त्या करण्यास त्यास अधिकार आहे असें मानलें जातें. एजंटास नेहमीच्या मामुली गोष्टी करण्यास अधिकार असतो; त्यांचेबाहेर विशेष गोष्टी करण्याचा त्यास अधिकार नसतो, ह्या नियमानुसार वरील दाव्यामध्यें बार्बरच्या कृत्याबद्दल कंपनीस जबाबदार धरतां येणार नाहीं. तथापि, कांहीं विशिष्ट परिस्थितीमध्यें अगदीं अनपेक्षित गोष्टीहि एजंटाच्या अधिकाराचे कक्षेंत येऊं शकतात. मात्र, एजंटास त्या गोष्टी करण्याचा अधिकार आहे असें इतरांस वाटण्याजोगी परिस्थिति असली पाहिजे. अशी परिस्थिति उपरिनिर्दिष्ट दाव्याचे संबंधांतील व्यवहारांत होती काय? कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमधील एका कलमानें डायरेक्टरांस आपले अधिकार इत्यादि दुसऱ्यास देण्यास हक्क ठेवलेला होता. कंपनीचीं आर्टिकल्स सर्वांस पहाण्यास खुलीं असतात आणि कंपनीशीं व्यवहार करणारा प्रत्येक मनुष्य तीं आर्टिकल्स वाचूनच व्यवहार करीत असतो, असें कायदा धरून चालतो. रॉलिंग्जनें बार्बरशीं व्यवहार केला तेव्हां त्यास डायरेक्टरांनीं विशेष अधिकार दिलेले असले पाहिजेत असा रॉलिंग्जचा ग्रह झाला होता, हें ह्यावरून सिद्ध होतें. तथापि, कंपनीचें देणें भागविण्यासाठीं दिलेला चेक स्वतःचे नांवानें करून घेण्यास त्यामुळें बार्बरला अधिकार पोंचतो, असा अर्थ होतो कीं काय? एक पूर्वीचा निवाडा ह्या बाबतींत मार्गदर्शक आहे. "विकणाराच्या एजंटास रोख रकम स्वीकारण्याचा अधिकार असल्यास, एजंटाचे नांवानें चेक काढून पैसे देणाऱ्या खरेदीदारावर, चेक पटल्यास, कोणत्याहि प्रकारची जबाबदारी रहात नाहीं" असा तो निवाडा आहे. प्रस्तुत दाव्याचे प्रकरणांत बार्बरला रोख रकमा स्वीकारण्याचा अधिकार होता आणि चेक वटल्यानें त्यास रोख रकम मिळाली होती. त्यानंतर त्यानें अफरातफर केली ती कंपनीच्या पैशाची केली, रॉलिंग्जच्या नव्हे, अशा आशयाचा निकाल प्रस्तुत दाव्यांत देण्यांत आला आहे.

---

### महाराष्ट्रांतील साखरेचे कारखाने

महाराष्ट्रांतील साखरेच्या कारखान्यांस येतें वर्ष चांगलें जाणार असा रंग दिसतो. साखरेचा भाव चढीचा आहे. तथापि, आणखी नवीन कारखाने निघाल्यास अंतर्गत स्पर्धा वाढण्याचा संभव आहे. सध्या महाराष्ट्रांत सात कारखाने चालू असून दोन कारखान्यांची उभारणी सुरू आहे. ह्या सात कारखान्यांनीं मिळून १,२०० सुशिक्षितांस आणि शेतावरील २० हजार मजुरांस काम दिलें आहे. आणखी नवीन कारखान्यांस परवानगी द्यावयाची अगर नाहीं ह्याचा विचार मुंबई सरकार करीत आहे. सर विश्वेश्वर अय्या ह्यांचे अध्यक्षतेखालीं नेमलेल्या कमिटीच्या शिफारसी तें लक्षांत घेईल.

# स्फुट विचार

## विमा कायद्याखालील नियमांचा मसुदा

विमाविषयक नवीन कायद्याखालील कानूंचा मसुदा सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें तयार केला असून तो हिंदुस्थान सरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे. ह्या नियमांत "ॲक्चुअरी"ची व्याख्या करण्यांत आली असून विमा कराराचीहि व्याख्या विस्तारानें देण्यांत आली आहे. ह्यापुढें, कंपनीची मुख्य कचेरी ब्रिटिश-हिंदुस्थानाबाहेर असल्यास, सदरहु कंपनीच्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रतिनिधींच्या मार्फत करार करण्यांत आले पाहिजेत. विमा कंपन्यांचेतर्फे बँका कांहीं रोखे धारण करीत असल्यास त्यांची बाजारभावानें होणारी किंमत ठरविण्याचा अधिकार बँकांस देण्यांत आला आहे. स्टर्लिंग रोख्यांची किंमत १ रु.=१ शि. ६ पे. ह्या दरानें केली जाईल. ज्या सभेमध्यें डायरेक्टरांची निवड व्हावयाची असेल तिची नोटीस सभेचे दिवसापूर्वी निदान २८ दिवस वर्तमानपत्रांतून द्यावी लागेल. विमाविषयक कायद्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यावर १२ महिन्यांचे आंत प्रत्येक विमा कंपनीच्या विमेदारांची सभा भरविण्यांत आली पाहिजे. फेब्रुवारी, १९३९ मध्यें वरील नियम अंमलांत येतील असें म्हणतात. परंतु प्रत्यक्ष विमा कायदाच १ एप्रिल, १९३९ चे आंत लागू होईल किंवा नाहीं हें निश्चित सांगतां येत नाहीं. विमा कायद्यांत कांहीं दुरुस्त्या व्हावयाच्या आहेत, त्या विधिमंडळांत मंजूर व्हाव्या लागतील आणि त्यामुळें कायद्याच्या अंमलजावणीस थोडा विलंब लागण्याचा संभव आहे.

## बँकांच्या कर्जविषयक धोरणांत बदल करण्याचा सल्ला

बाँबे बुलियन एक्सचेंजचे उपाध्यक्ष, श्री. लक्ष्मणदास दगा, ह्यांनीं एक्सचेंजच्या १६ व्या वार्षिक सभेचे प्रसंगीं भाषण करतांना, हिंदुस्थानांतून होणारी सोन्याची निर्गत देशाचे हितास कशी विघातक आहे ह्यांची चर्चा केली. सोन्याच्या चढलेल्या बाजारभावाचा फायदा हिंदी शेतकरी मिळवित आहेत, असें सोन्याच्या निर्गतीचें समर्थन करणारे सांगत असतात. परंतु त्यांत कांहीं तथ्य नाहीं, सोन्याची निर्गत हें दारिद्र्याचें लक्षण आहे, असें श्री. दगा ह्यांनीं सांगितलें. सोन्याच्या निर्गतीमुळें हिंदुस्थान सरकारची हुंडणावळविषयक अडचण टळली तरी त्यामुळें हिंदी जनतेचें नुकसानच झालेलें आहे, असें ते म्हणाले. सरकारी रोख्यांत कमी दरानें आपले पैसे गुंतविण्याच्या बँकांच्या प्रवृत्तीवर त्यांनीं टीका केली आणि कच्चा माल आणि औद्योगिक उत्पादन ह्यांकडे लोकांनीं अधिकाधिक लक्ष पुरवावें असें त्यांनीं सचविलें. श्री. दगा ह्यांची ही सूचना विचारांत घेण्याजोगी आहे, परंतु उद्योगधंद्यांस अधिक किफायतशीरपण कर्जें देण्यास बँका कचरतात ह्याचें कारण धंद्यांतच नफ्याची कूस राहिलेली नाहीं हें येथें नमूद केलें पाहिजे. अगदीं अल्प दरानें कर्जें देऊं केलीं असतांहि तारणाचे अभावीं रकम गुंतवितां येत नाहीं असा अनुभव बँकांस येतो. कर्जदारांची वाण नाहीं आणि त्यांस द्यावयास बकांजवळ पैसाहि आहे, परंतु योग्य तारण नसल्यामुळें सरकारी रोख्यांतच पैसे ठेवणें बँकांस भाग पडत आहे. बँकांच्या सांपत्तिक मजबुतीच्या दृष्टीनेंहि विशिष्ट प्रमाणांत ह्याची आवश्यकता असते, हेंहि येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. सुरक्षित कर्जांत पैसा गुंतवणें शक्य असतांनाहि बँका तो व्यवहार करीत नाहींत असला वेडेपणा त्यांचे पदरीं बांधणें चाष्ट्याचें आहे.

## कॉमनवेल्थ कंपनीचें तृतीय मूल्यमापन

कॉमनवेल्थ विमा कंपनीचा नववा वार्षिक रिपोर्ट आणि तिचें तृतीय मूल्यमापन ह्यासंबंधीं माहिती गेल्या अंकांत देण्यांत आली होती, तीवरून कंपनीच्या यशस्वी कारभाराची सहज कल्पना येईल. पहिल्या वर्षीं कंपनीनें १ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें, आणि तेव्हांपासून आतांपर्यंत तिच्या कामांत सालोसाल समाधानकारक वाढ होत आली आहे. अहवालाचे वर्षीं कंपनीनें सुमारें ४०½ लक्ष रुपयांचे विमे दिले आणि आपल्या लाइफ फंडांत ३ लक्ष, ८१ हजार रुपयांची भर टाकली. कंपनीच्या खर्चाचें प्रमाण एकसारखें उतरत आलें असून अहवालाचे सालीं तें ३९.१७% इतकें खालीं राहिलें. गतसालांतील खर्चाचे प्रमाणापेक्षा हा आकडा २.४८ नीं लहान आहे. कंपनीच्या मूल्यमापनांत आढळलेला वाढावा, कंपनीस पडत असलेला व्याजाचा किफायतशीर दर, तिची वाढती लोकप्रियता, तिचें प्रगतिपर धोरण, इत्यादि गोष्टी अहवालाचे आणि ॲक्चुअरीच्या रिपोर्टाचे परिशीलनावरून तात्काळ ध्यानांत येतील. कंपनीच्या भागांस मोठी मागणी आहे आणि ह्यामुळें कंपनी आपले कांहीं भाग १० रुपये वाढाव्यानें विकून सुमारें १७½ हजार रुपये जमा करू शकली. ह्या रकमेचा विनियोग कंपनी आणखी सुदृढ करण्याकडे करण्याबाबत बोर्डाची शिफारस आहे. कंपनीचे ॲक्चुअरी, श्री. ग. स. मराठे, ह्यांनीं विमेदारांस सुमारें २½ लक्ष रुपये वाढाव्यांतून दर हजारीं दरसाल १८ आणि १५ रुपये बोनस देण्याविषयीं शिफारस केली आहे आणि कंपनीच्या किफायतशीर व्यवहाराबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें आहे. कंपनीची प्रगति तिच्या चालकांस अत्यंत भूषणावह आहे, ह्यांत संशय नाहीं.

## कपाशीचें दर एकरी उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

सन १९३५-३६ मध्यें हिंदी कपाशीच्या पिकाची किंमत ६३ कोटि रुपये भरली; १९३६-३७ मध्यें त्याची किंमत ६९ कोटि रुपये झाली आणि १९३७-३८ च्या पिकाची किंमत फक्त ४३ कोटि रुपये आली. हिंदुस्थानांतील गिरण्यांमध्यें कपाशीस मागणी वाढत असली तरी एकूण हिंदी उत्पादनाच्या निम्म्याइतकीहि कपास त्यांत खपत नाहीं. सबंद जगांतच कपाशीचा मोठा सांठा पडून राहिलेला आहे आणि त्यामुळें हिंदी कपाशीचा बाजारभावहि असमाधानकारक रहाणार हें उघड आहे. हिंदुस्थानांतील कपाशीच्या उत्पादनाचें प्रमाण दर एकरास ८९ पौंड इतकें पडतें; अमेरिकेमध्यें प्रत्येक एकरांतून २६७ पौंड कपास निघते. दर एकरीं उत्पादन वाढल्याखेरीज कपास पेरणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांचे वाईट दिवस संपणें शक्य नाहीं. जागतिक उत्पादन नियंत्रित करणें अगर त्याचा बाजारभाव ठरवणें हिंदी शेतकऱ्यांच्या अगर सरकारच्या स्वाधीन नाहीं; परंतु दर एकरीं उत्पादन वाढविणें त्यांस शक्य आहे. स्वस्त खतांचा पुरवठा आणि तज्ज्ञांचा सल्ला ह्यांच्या सहायानें शेतकऱ्यांस आपल्या जमिनींतून अधिक पीक काढतां येईल आणि त्यामुळें त्यांस उत्पन्नहि ज्यास्त मिळेल. सेंट्रल कॉटन कमिटी आणि प्रांतिक सरकारें ह्यांनीं हा प्रश्न हातीं घेतला पाहिजे.

### पेट्रोलच्या विक्रीवरील कर—फेडरल कोर्टाचा निवाडा

मध्यप्रांत सरकारनें त्या प्रांतांतील पेट्रोल आणि मोटारीचीं तेलें ह्यांच्या किरकोळ विक्रीवर कर बसविला. तथापि, ही कराची बाब १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टाप्रमाणें मध्यवर्ती सरकारचे कक्षेंतील आहे, असा त्या सरकारानें आक्षेप घेतला. गव्हर्नर जनरलनें ह्या प्रश्नाचा निकाल फेडरल कोर्टाकडे सोपविला. फेडरल कोर्टानें आतां आपला निवाडा दिला असून, मध्यप्रांत सरकारचा पेट्रोलवरील कर हा 'एक्साइज' ह्या सदरांत येत नसल्यानें मध्यवर्ती सरकारच्या अधिकारावर अतिक्रमण होण्याचा प्रसंग उद्भवत नाहीं असें कोर्टानें स्पष्ट केलें आहे. मध्यवर्ती विधिमंडळानें मालाच्या उत्पादनावर एक्साइज पट्टी बसवावी, परंतु किरकोळ विक्रीवर पट्टी बसविण्याचा प्रांतांस अधिकार आहे असें फेडरल कोर्टाच्या तीनहि न्यायाधिशांचें मत आहे. राज्यघटनेनें प्रांतिक सरकारांकडे वाढत्या उत्पन्नाच्या बाबी ठेवलेल्या नसल्यामुळें त्यांची कुचंबणा होत आहे आणि प्रस्तुत प्रकरणीं फेडरल कोर्टाचा निवाडा प्रांतांच्याविरुद्ध गेला असता तर त्यांचा कर बसविण्याचा अधिकार आणखी मर्यादित झाला असता. एक्साइज पट्टी बसविण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारास फक्त आहे, आणि एकाद्या मालाचे उत्पादनावर ही पट्टी त्या सरकारनें बसविली तरी त्याच मालाच्या किरकोळ विक्रीवर प्रांतिक सरकारांनीं पुनः पट्टी लादण्यास प्रत्यवाय नाहीं, ही गोष्ट आतां स्पष्ट झाली आहे. मध्यप्रांत सरकार विरुद्ध हिंदुस्थान सरकार असा हा वांधा होता. तथापि सर्वच प्रांतांच्या हितसंबंधाचा तो प्रश्न असल्यानें फेडरल कोर्टाचा निर्णय त्या सर्वांस संतोषकारक वाटेल ह्यांत आश्चर्य नाहीं.

### इनकम टॅक्स बिलाची प्रगति

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें इनकम टॅक्स बिलाचें दुसरें वाचन चालू आहे. तथापि बिलांतील कांहीं महत्त्वाच्या कलमांस विरोधी पक्षाचा पाठिंबा नसल्यानें बिलाची प्रगति मंदावली आहे. युरोपियनांस विशेष सवलती देणाऱ्या कोणत्याहि योजनेस आम्ही पाठिंबा देणार नाहीं, असें युरोपियन प्रतिनिधींनीं असेंब्लींत जाहीर केल्यामुळें सरकारास बिलाच्या चवथ्या कलमास बहुमत मिळणें अशक्य झालें आणि प्रत्यक्ष युरोपियन प्रतिनिधींनींच प्रस्तुत कलमाचा अर्थ उघड करून दाखविल्यामुळें सरकारास तडजोडीच्या भाषेचा अवलंब करणें भाग पडलें. हिंदी लोकमत ह्या चवथ्या कलमांतील योजनेस पहिल्यापासूनच विरोध करीत आहे. मि. जिना आणि श्री. भुलाभाई देसाई ह्यांनीं सरकारनें सुचविलेल्या तडजोडीस आपली मान्यता आतां दर्शविली आहे, आणि त्यामुळें बिलाच्या वाचनाची प्रगति झपाट्यानें होण्यास अडचण उरलेली नाहीं.

### ओटावा करार रद्द होणार

मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या बजेटाचे अधिवेशनानंतर, म्हणजे एप्रिल १९३९ पासून ओटावा करारांतील अटी हिंदुस्थानास बंधनकारक रहाणार नाहींत, असें सर एम. झाफरुल्लाखान ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### हिंदी पशुवैद्यक

गुरांच्या रोगांचें निदान करण्याची देशी पद्धति आणि गुरांस देण्यांत येणारीं देशी औषधें ह्यासंबंधीं चौकशी करण्याच्या कामास इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें प्रारंभ केला आहे.


## दं. म. शें. ४ आणे व्याजानें कर्ज

कर्जखात्याची नवीन योजना लोकप्रिय होऊन अवघ्या १५ दिवसांत ११ लोकांस प्रत्यक्ष कर्ज देण्यांत आले त्यांचीं नांवें:—

| नांव | पत्ता | कर्ज रकम | दिल्याची तारीख |
|---|---|---|---|
| १ पिराजी नारायण शिंदे | पुणें म्यु. सर्व्हंट | रु. ५० | १६-११-३८ |
| २ दत्तात्रय महादेव वैद्य | ,, | रु. ५० | १७ ११-३८ |
| ३ रामा बोध कसाब | ,, | रु. ५० | १८-११-३८ |
| ४ लक्ष्मण रामभाऊ थोरात | ,, | रु. ५० | २०-११-३८ |
| ५ भाऊ किसन कांबळे | ,, | रु. ५० | २२-११ ३८ |
| ६ सिताराम तुकाराम पवार | ,, | रु. ५० | २२-११-३८ |
| ६ सिताराम तुका पवार | ,, | रु. ५० | २२-११-३८ |
| ७ रामा बंडू थोरात | ,, | रु. ५० | २३-११-३८ |
| ८ हैबती मलु कसाब | ,, | रु. ५० | २६-११-३८ |
| ९ तुकाराम गायकवाड | ,, | रु. ५० | २७-११-३८ |
| १० गणु दुलबा ढावरे | ,, | रु. ५० | २८-११-३८ |
| ११ हरी मामा कांबळे | ,, | रु. ५० | ३०-११-३८ |
| १२ गुणाबाई बाप गोपाळा मात्रे | ,, | रु. ५० | १-१२-३८ |
| १३ लक्ष्मीबाई नारायण भडकवाड | ,, | रु. ५० | २-१२-३८ |
| १४ रमाबाई नामा कांबळे | सबरबन म्यु. | रु. ५० | ३-१२-३८ |
| १५ सौ. रमाबाई एस. गायकवाड, शिक्षक | एस. गायकवाड स्कूल | रु. ५० | ५-१२-३८ |
| १६ पांडरंग बंडूलाल परदेशी, व्यापारी | | रु. १०० | ५-१२-३८ |

अवघे ७ रु. भरून रु. ५० व रु. १४ भरून रु. १०० कर्ज मिळतें. यापेक्षां अधिक रकमांसाठीं प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ८२ आण्यांचीं तिकिटें पाठवा. कर्ज अनुक्रमानें मिळत असल्यामुळें लवकर अर्ज करून लवकर कर्ज मिळवितां येतें.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रिअल कं. लि.**

हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँच ४८ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २



छपाईची उत्कृष्ट स्वदेशी शाई

गुणांत व किंमतींत कोणत्याहि परदेशी शाईची

स्पर्धा करील अशी

## स्वदेशी शाई वापरा

व

आपली छपाई सुधारा

हिंदी भांडवलदार : हिंदी व्यवस्थापक

## इंडिया इंक्स ॲन्ड पेंट्स इंडस्ट्रीज लि.

वेस्ट एन्ड, खेड (पुणें)

**आजच लिहा !**

**मोटारच्या सारथ्यांचें आणि पादचारी लोकांचें आत्मपरीक्षण**

"दि सेफ्टी फर्स्ट असोसिएशन ऑफ इंडिया"नें मोटार चालविणारांसाठी आणि पादचारी लोकांसाठी कांहीं प्रश्न सुचविले आहेत. त्यांचीं त्यांनीं उत्तरें देऊन स्वतः 'दोषी' अगर 'निर्दोषी' आहोंत, हें ठरवावें, असा त्यांत हेतु आहे.

मोटार चालविणारानें खालील प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं:—

(१) दिवाणखान्यामध्यें जितक्या सभ्यतेनें वागतों तितक्या सभ्यतेनें मी रस्त्यावर वागतों का ?

(२) माझ्याइतकाच इतरांसहि रस्त्याचा उपयोग करण्यास अधिकार आहे, हें मी जाणतों का ?

(३) पादचारी लोकांशीं वागतांना मी मर्यादातिक्रमण करतों काय ?

(४) मी वेळेवर आणि योग्य प्रकारें इशारत देतों का ?

(५) मोटार हाकतांना माझें तोंड हंसरें असतें का तें दुर्मुखलेलें असतें ?

(६) स्त्रिया आणि मुलें ह्यांशीं मी वाईट वागतों का ? आणि अंधळ्यांची, म्हाताऱ्यांची व पंगू लोकांची विशेष काळजी घेतों का ?

(७) चौकामध्यें मोटार थांबवून कोणाचें चुकलें म्हणून भांडत मी उभा रहातों काय ? का महामूर्खांशीं वितंडवाद न घालतां त्यांस मी रस्ता मोकळा करून देतों ?

(८) ज्यास जास्त आवश्यकता असेल त्यास मी पुढें जाऊं देतों किंवा नाहीं ? मला कोणीं पुढें जाऊं दिल्यास मी आभारप्रदर्शक मान हालवतों किंवा नाहीं ?

(९) शाळा ओलंडतांना मी सावकाश आणि आवाज न करतां जातों किंवा नाहीं ?

(१०) रस्त्याच्या शक्य तेवढ्या कडेस, इतरांस त्रास होणार नाहीं अशा रीतीनें, मी गाडी उभी करतों का ?

(११) मोटारीचें शिंग जरूर तेव्हांच मी वाजवतों किंवा नाहीं ?

(१२) जितका विनय माझे अंगीं असावयास पाहिजे असें इतरांस वाटतें, तितका तो आहे का ? ह्यापेक्षा जास्त विनयशील मला होतां येणार नाहीं का ?

पादचारी मनुष्यानें खालील प्रश्नांचीं उत्तरें द्यावींत:—

(१) मी फुटपाथवरून चालून मोटारींसाठीं रस्ता मोकळा ठेवतों का ?

(२) फुटपाथवरून, सज्जांतून, जिन्यावरून आणि रेल्वेपुलावरून जातांना मी डाव्या बाजूनें चालतों का ?

(३) रस्त्यांचे चौकांत वयस्क आणि पंगू लोकांस आणि लहान मुलांस रस्ता ओलांडण्यास मी मदत करतों का ?

(४) फुटपाथवरील आणि रेल्वे फलाटावरील फळांचीं सालें मी पायानें बाजूस सारतों का ?

(५) ट्राममध्यें आणि आगगाडीमध्यें चढण्यापूर्वीं आंतील उतारूंस मी उतरण्यास सवड देतों का ?

(६) माझ्या छत्रीमुळें दुसऱ्या कोणास उपसर्ग पोचतो का ?

(७) रेल्वेच्या आणि सिनेमाच्या तिकिटांचे खिडकीशीं अनुक्रमाप्रमाणें ओळींत मी उभा रहातों का ?

(८) आगगाडीचा डबा, ट्राम, बस, इत्यादींमधील धूम्रपानासंबंधीं सूचना मी पाळतों का ?

(९) मी जितका विनयशील असावयास पाहिजे तितका तो असल्याचें इतरांस वाटतें का ?


**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

## " URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat, Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

# CONFIDENCE

**is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its**

## YEARS OF

**Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service**

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

**The following figures will convince you :**

## NEW BUSINESS

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

## BONUS

PER THOUSAND PER YEAR

**On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## सहकारी जनतेस विनंति

( ले.:—श्री. विनायक गणेश तिखे, अध्यक्ष, पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूट, पुणें )

सहकारी चळवळींत सहकारी इन्स्टिट्यूट ही एक प्रमुख संस्था आहे. इन्स्टिट्यूटच्या कार्यामुळें या संस्थेस सहकारी चळवळींमध्यें श्रेष्ठ प्रतीचें स्थान मिळालें आहे. ह्या संस्थेनें सहकारी चळवळींतील पुष्कळ प्रश्नांबाबत सहकारी संस्था व जनता ह्यांच्या हिताच्या दृष्टीनें अनेक यशस्वी प्रयत्न केले आहेत. इन्स्टिट्यूटमधील कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळें कांहीं प्रसंगीं सरकारास आणि सरकारी अमलदारास आपलें धोरण बदलावें लागलें आहे. इन्स्टिट्यूटच्या कार्यामुळें इन्स्टिट्यूट ही सहकारी संस्था व जनता यांच्या विश्वासाचें आणि आश्रयाचें स्थान अशी समजली जाऊं लागली.

इन्स्टिट्यूटचें हें महत्त्व आणि कार्यक्षमत्व कांहीं लोकांच्या डोळ्यांत सलूं लागलें व इन्स्टिट्यूट ही संस्था कमजोर कशी होईल व तिचें महत्त्व कमी कसें होईल याचे प्रयत्न सुरु झाले. शेवटीं आज अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं, शेतकऱ्यांची प्रातिनिधिक स्वरूपाची अशी ही इन्स्टिट्यूट यापुढें निर्माल्यवत राहील कीं काय अशी साधार भीति उत्पन्न झाली आहे.

या सर्व परिस्थितीचा विचार करून पुणें जिल्हा सहकारी इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळानें ही बाब जिल्ह्यांतील सहकारी बांधवांपुढें ठेवावी, त्यास सर्व परिस्थिति समजावून सांगावी व त्याचें जें मत होईल तें मुंबईच्या मुख्य कचेरीस कळवावें; तसेंच या कामीं इतर जिल्हा शाखांचीही मदत घेऊन सार्वत्रिक उपाययोजना आखावी असें ठरविलें आहे.

हा हेतु पुढें ठेवून जिल्ह्यांत तालुका निहाय सहकारी परिषदा भरविण्याचें योजलें आहे. पहिली परिषद् पुरंधर तालुक्याची सासवड येथें ता. ७–१२–१९३८ रोजीं श्री. दा. वि. उर्फ बाबुराव गोखले यांचे अध्यक्षतेखालीं भरली. दुसरी परिषद् ( खेड–जुन्नर तालुक्याची ) ता. ११–१२–१९३८ रोजीं खेड येथें श्री. कृष्णाजी पुरुषोत्तम दीक्षित वकील यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे. बाकीच्या तालुक्यांच्या परिषदा लागोपाठ भरणार आहेत व शेवटीं पुणें जिल्ह्याचें एकत्रित मत प्रदर्शित करणेकरीतां पुणें जिल्हा सहकारी परिषद् भरविण्यांत येणार आहे.

या सर्व कामीं सहकारी संस्था व सहकारी जनता यांनीं आपुलकीच्या भावनेनें पुणें जिल्हा को-ऑप० इन्स्टिट्यूटला मदत करावी अशी विनंति आहे.

### आगगाड्यांवरील फिरत्या जाहिराती

आपल्या मालाच्या वॅगन्सच्या बाहेरील दोन्ही बाजू जाहिरातीसाठीं उपयोगांत आणण्याची योजना ईस्टर्न बेंगॉल रेल्वेनें आखली आहे. न्यूझीलंडमध्यें अशा जाहिराती लावतात. त्या संबंधांत तेथील रेल्वेजचा सल्ला ई. बें. रेल्वेनें घेतला आहे. व्यापारी आणि कारखानदार ह्या नव्या योजनेचा फायदा घेण्यास कितपत तयार होतील, वॅगन्सवर जाहिराती रंगविण्यास किती खर्च येईल, ह्या जाहिराती सुस्थितींत कशा रहातील, जाहिरातींचें उत्पन्न किती येईल, इत्यादि गोष्टींविषयीं रेल्वे कंपनी अंदाज आणि हिशेब करीत असून नक्की योजना लवकरच तयार होईल.

## महाराष्ट्र विमा कंपनीस नामदार मावळणकर ह्यांची भेट

ता. २७ नोव्हेंबर रोजीं दुपारीं ४ वाजतां मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे स्पीकर नामदार मावळणकर यांनीं कराड येथील महाराष्ट्र इन्शुअरन्स कंपनीस भेट दिली त्यावेळीं समारंभास कंपनीचे अध्यक्ष आमदार पांडुअण्णा शिराळकर, डायरेक्टर्स, शेअरहोल्डर्स व शहरांतील इतर प्रमुख मंडळी हजर होती.

### कंपनीचा परिचय

प्रथम कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. तात्यासाहेब भाटे यांनीं कंपनीच्या "कल्पतरू" बॉंडची योजना व प्रॉव्हिडंट विम्याची योजना यांचा परिचय नामदारसाहेबांना करून दिला व कंपनीस भेट दिल्याबद्दल नामदारसाहेबांचे आभार मानले. नंतर नामदारसाहेबांना कंपनीतर्फे पुष्पहार समर्पण करण्यांत आल्यावर उत्तरादाखल भाषण करितांना नामदार मावळणकर म्हणाले, "...व्यापारधंदे अवश्य करावे. आज त्यांची आपल्या देशास अत्यंत जरूर आहे. आपण ही विमा कंपनी सुरू करून राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचें कार्य करीत आहांत ही आनंदाची गोष्ट आहे. प्रथम प्रथम आपणांस कोणतेंही कार्य करितांना, संस्था चालवितांना अनेक अडचणी येतील, अंतोनात कष्ट पडतील, फायदाही होणार नाहीं, हें खरें; पण अशाही परिस्थितींत प्रथम स्वतःच्या फायद्याकडे लक्ष न देतां सचोटीनें व नेकीनें आपली संस्था चालवून जनहित साधीत राहिल्यास आपल्या

### कंपनीस परमेश्वर निःसंशय यश

देईल अशी माझी खात्री आहे." याच वेळीं कंपनीचे चीफ एजंटस मे. सरडे अँड घाटगे यांनींही आपल्या चीफ एजन्सीमार्फत नामदारांना पुष्पहार समर्पण करून शिवाय त्यांनीं बॉर्डन ऑर्गनायझिंग ऑफिस, कराड, मार्फतही नामदारांना पुष्पहार घातला. शेवटीं कराडचे फोटोग्राफर श्री. ग. वि. फडके यांनीं नामदारांचा फोटो घेतला.

सदर समारंभानें महाराष्ट्र विमा कंपनीच्या कार्याबद्दल स्थानिक लोकमतावरही पुष्कळच सुपरिणाम झाल्याचें दिसून आलें. या समारंभास चीफ एजंटस यांच्या निमंत्रणावरून साताऱ्याचे स्पेशल ऑर्गनायझर श्री. टी. आर अभंग हेही उपस्थित होते.

आपणांस आयुर्विम्याच्या शास्त्रशुद्ध व फायदेशीर योजना हव्या असतील तर त्या

**इंडियन प्रोग्रेसिव्ह**

**इन्शुअरन्स कंपनी लि. पुणें शहर या कंपनींतच मिळतील.**

ठिकठिकाणीं अनुभवी व मेहनती प्रचारक नेमणें आहेत. मासिक पगाराखेरीज, प्रवासखर्च व भरपूर कमिशन.

श्री. आर. जी. काटे
ऑर्गनायझर,
बेडेकर बिल्डिंग
दादर.

सेक्रेटरी
हेड ऑफिस
पुणें.

## शेतीच्या मालाच्या उठावांत सुधारणा

### प्रांतिक प्रधानांची परिषद

शेतीच्या मालाच्या उठावाचे प्रश्नाची चर्चा करण्याकरितां प्रांतिक प्रधानांची परिषद गेल्या आठवड्यांत दिल्ली येथें भरली होती. परिषदेस मुंबई प्रांतातर्फे ना. मुरारजी देसाई आणि ना. लठ्ठे हे हजर होते.

आपल्या प्रास्तविक भाषणांत हिंदुस्थान सरकारच्या शिक्षण व आरोग्य खात्याचे मंत्रि, सर जगदीश प्रसाद, म्हणाले:—"गिऱ्हाइक देत असलेली किंमत आणि मालाच्या उत्पादकास मिळणारी किंमत ह्यांमध्यें अत्यंत मोठी तफावत आहे. मालाच्या उठावाची नीट व्यवस्था केल्यास उत्पादकास त्याचे मालाबद्दल चांगली किंमत मिळेल आणि मालाचा दर्जाहि वाढण्यास सहाय होईल. शहरांतून शुद्ध तुपाचा पुरवठा अयाप होऊं नये, हें सध्याच्या असमाधानकारक परिस्थितीचें निदर्शक आहे. १९३४ सालीं हिंदुस्थान सरकारनें एका मध्यवर्ती मार्केटिंग कचेरीच्या पांच वर्षांच्या खर्चाचे तरतुदीसाठी २७ लक्ष रुपयांची ग्रँट दिली आणि इंपीरियल कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्चचेमार्फत प्रांतांस १० लक्ष रुपये वांटण्याची व्यवस्था केली. १९३५ सालीं ह्या योजनेच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाला. म्हणजे, मध्यवर्ती आणि प्रांतिक मार्केटिंग अधिकाऱ्यांनीं कामास सुरवात करून आतां कोठें चार वर्षें लोटलीं आहेत. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, त्यांची निरक्षरता, त्यांच्यामध्यें संघटनाचा अभाव, त्यांस कर्जे मिळण्याची अडचण, वहातुकीच्या रस्त्यांचा अभाव, वजना-मापांचा बुजबुजाट, मध्यस्त दलालांची मोठी संख्या इत्यादि अनेक कारणांमुळें उत्पादक आणि उपभोक्ते ह्यांचेमधील अंतर दुरावलेलें आढळतें. शेतीविषयक माहितीच्या आकड्यांचे बाबतींत सुधारणा होण्यास पुष्कळ वाव आहे. कांहीं ताज्या अंदाजांवरून असें म्हणतां येईल, कीं गिऱ्हाइकानें गव्हास दिलेल्या किंमतीपैकीं शेकडा फक्त ६० इतकी रकम उत्पादकास मिळते. फळांच्या बागवानास इतकेहि पैसे हातीं येत नाहींत. चार वर्षांच्या अवधींत मध्यवर्ती आणि प्रांतिक मार्केटिंग अधिकाऱ्यांनीं समाधानकारक काम केलें आहे. अनेक प्रकारच्या मालाच्या उठावासंबंधीं चौकशी करण्यांत आली असून मालाची प्रतवारी लावतां यावी ह्यासाठी एक कायदा पास करून घेण्यांत आला आहे. फळें, तूप, अंडीं, तंबाखू, इत्यादींची प्रतवारी लावण्यासाठी साठ केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. गहूं, इत्यादि मालाच्या खरेदी-विक्रीच्या करारांतील अटींचे नमुनेहि तयार करण्यांत आले आहेत. आजपर्यंत सुमारें २० लक्ष रुपये किंमतीच्या मालाची प्रतवारी लावण्यांत आली आहे. एकूण व्यापारी उलाढालींचे मानानें झालेलें कार्य अगदींच अल्प आहे आणि अनेक वर्षे चिकाटीनें कार्य करीत राहिल्याविना शेतीच्या मालाच्या उठावाची व्यवस्था समाधानकारक होणार नाहीं."

व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन करतेवेळीं भाषण केलें. ते म्हणाले:—"मालाच्या उठावासंबंधीं चांगल्या योजना तयार होण्यास चौकशीची पूर्वतयारी अवश्य पाहिजे आणि ह्या पूर्वतयारीवर होणारा वेळेचा आणि पैशाचा खर्च कोणींहि अकारण समजण्याचें कारण नाहीं. कांहीं बाबतींत घाई केली असतां पाऊल झपाट्यानें पुढें पडल्यासारखें भासेल, परंतु त्यानें खरी प्रगति होणार नाहीं. जमा केलेल्या माहितीवरून योग्य तो बोध घेण्याचें काम शास्त्रीय पद्धतीनेंच पार पाडलें पाहिजे." मार्केटिंग अधिकाऱ्यांच्या व्यापक क्षेत्राचें वर्णन करून आणि मालाच्या उठावासंबंधांत प्रांतिक सरकारांनीं केलेल्या प्रगतीसंबंधीं समाधान व्यक्त करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

---

### १९३८-३९ च्या पहिल्या सहामाहींतील कापडाची आयात

एप्रिल ते सप्टेंबर, १९३८ ह्या सहामाहींत हिंदुस्थानामध्यें एकूण २७ कोटि, ८२ लक्ष वार कापडाची आयात झाली. १९३७-३८ च्या सत्सम मुदतीमधील आयातीपेक्षा ही आयात ४ कोटि, २४ लक्ष वारांनीं अधिक आहे. ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानाकडे १९३७-३८ च्या पहिल्या सहामाहींत पाठविलेल्या कापडापेक्षा चालू वर्षाच्या सहामाहींत पाठवलेलें कापड २ कोटि, ५९ लक्ष वार कमी भरलें. एकूण ११ कोटि, ३३ लक्ष वार ब्रिटिश कापडाची आयात झाली.

### लोकप्रियतेस ओहोटी

झेकोस्लोव्हेकियाचे माजी प्रेसिडेंट, डॉ. बेनस, ह्यांच्या नांवाचें महत्त्व आतां नाहींसें झालें असल्यामुळें एक झेक कंपनी आपल्या "डॉ. बेनस" ह्या आगबोटीस नवीन नांव देणार आहे. जर्मनीनें ज्यू नांवें अशाच रीतीनें बदललीं आहेत. जहाजांस नांवें देतांना राजकीय अगर व्यापारी हेतु साधावयाचा असतो आणि त्यास अनुसरून नांवें बदलण्यांत येतात. "तुकाराम" इत्यादि नांवें हिंदी समुद्रांत संचार करणाऱ्या आगबोटींस दिलेलीं आढळतात, त्याचेंहि गमक हेंच आहे.

---


## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि.



श्री. डी. एन. डांगे
जनरल मॅनेजर



श्री. डी. व्ही. अत्रे, बी. ए. एलएल. बी.,
मॅनेजिंग डायरेक्टर



श्री. डी. जी. भागवत
ऑफिस मॅनेजर

### डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीचा, ३१ मार्च १९३८ असेर संपलेल्या वर्षाचा, अहवाल आमचेकडे आला आहे. अहवालाचे वर्षी कंपनीकडे १० लक्ष, ६२ हजारांचे विमा-अर्ज आले, त्यांपैकीं कंपनीनें ७ लक्ष, ५७ हजारांच्या विमा पॉलिसी दिल्या. ३१ मार्च, १९३८ असेर कंपनीचें चालू काम ११ लक्ष ४२ हजारांचें आहे आणि त्यांचें वार्षिक हप्त्यांचें उत्पन्न ४३½ हजार रुपये भरतें. कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे ५५, ७०० रुपये दर्शनी किंमतीचे रोखे अनामत ठेवलेले आहेत. ऑक्टोबर, १९३८ असेर कंपनीकडे चालू असलेल्या विम्यांची रकम १७ लक्ष,६२ हजार रुपये भरते, त्यापासून हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न ७५ हजारांवर येऊं लागेल. नवीन कंपनी कायद्याच्या अटी पार पाडण्यास कंपनीस त्यामुळें साधन प्राप्त होण्यास अडचण पडणार नाहीं, असा डायरेक्टर बोर्डास भरंवसा वाटत आहे. कंपनीचे चीफ एजंट्स मेसर्स डी. डी. दास अॅन्ड कंपनी, ह्यांनीं आपल्या करारापेक्षा जास्त काम कंपनीस मिळवून दिल्याबद्दल डायरेक्टर बोर्डानें तिचे आभार मानले आहेत. कंपनीचें भरणा झालेलें भांडवल १६, ५६७ रुपये असून तिचेकडे सुमारें ५० हजारांच्या मुदतबंद ठेवी आहेत. कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेल्या रोख्यांची किंमत ४९,६३५ रुपये असून कंपनीकडे ७८½ हजारांचीं कर्जें येणें आहेत. कंपनीचें एप्रिल १९३४ ते मार्च १९३८ ह्या मुदतीचें दुसरें मूल्यमापन चालू असून त्याचा निकाल वर्षअसेर प्रसिद्ध होईल. कंपनीच्या प्रगतीची कल्पना खालील तक्त्यावरून येईल:—

| १ एप्रिल ते ३१ मार्च | नविन मिळवलेलें काम | हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न | विमाखाती फंड | सरकारकडे अनामत रोखे | एकूण चालू काम |
|---|---|---|---|---|---|
| १९३६–१९३७ | २,२१,७०० | १९,०१२ | ५४,४१२ | ४५,७०० | ५,८४,४०० |
| १९३७–१९३८ | ७,५७,१५० | ४३,३८५ | ६६,३२० | ५१,७०० | ११,४१,[illegible] |
| ६ महिने ऑक्टोबर १९३८ | ४,२१,३५० | ७५,००० | ६७,८९० | ५५,७०० | १७,६२,९०० |

### मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटची प. खानदेश जिल्हा शाखा

वरील शाखा इन्स्टिटयूटच्या पटावर ५ व्यक्ती आणि ३४९ सोसायट्या सभासद आहेत. अहवालाचे वर्षी इन्स्टिटयूटच्या विद्यमानें दोंडाईचें येथें शिंदखेडें तालुक्यांतील सोसायट्यांची सभा बोलावण्यांत आली होती, तीमध्यें प. खा. जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघामार्फत सभासदांनीं माल खरेदी करावा आणि विकावा ह्याबाबत प्रचार करण्यांत आला. ह्या खेरीज, रिपोर्टाचे मुदतींत, तीन फील्ड वर्कर्सच्या परिषदा भरविण्यांत आल्या, त्यांमध्यें सवलतीची योजना, कर्जवसुलीचा प्रयत्न, इत्यादि विषयांबाबत चर्चा होऊन ठराव करण्यांत आले. वेळोवेळ सेक्रेटरींचे शिक्षण वर्गहि भरविण्यांत आले. वरील वृत्तांतावरून, प. खा. जिल्हा इन्स्टिटयूटनें गेल्या वर्षी समाधानकारक काम केलें असें म्हणतां येईल. वर्षअसेर एकूण येणें वर्गणी सुमारें ६,८०० रुपये आहे. ह्या बाबतींत सुधारणा होणें आवश्यक आहे. व्यक्तिशः सभासदांच्या संख्येंतहि वाढ होण्यास पुष्कळच वाव आहे.


## ६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. मॅनेजिंग डायरेक्टर

## सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा

मोती चौक : : : सातारा

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय:२२ /अ, हॉस्पिटल रोड ( सी. अॅण्ड. अेम् स्टेशन ) बंगलूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्**: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्**: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीहि वेळां पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी**: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्या संबंधींची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात. सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट, पुणें.

एच. जी. गद्रे, एजंट लक्ष्मीरोड, पुणें. २

## एका नमुनेदार खेडेगांवाचें दृश्य

( ले. श्री. का. द. कुळकर्णी, खेड )

[ ३ ]

सर्व गांव एकदिलानें वागत असल्यामुळें तंटेबखेडे कमी झालेले आहेत. दिवाणी स्वरूपाचे अगर फौजदारी स्वरूपाचे खटल्याचे निमित्तानें गांवांतील पैसे खर्च होणेचें बहुतेक बंद पडलें आहे. गांवकरी लोकांच्या समंजसपणामुळें कोणतीहि गोष्ट आपापसांत मिटाविणेंत येते अशी या-गांवाची ख्याति आहे. गांवांतील लग्न-कार्यादि संस्काराप्रीत्यर्थ बेताबातानेंच खर्च करणेकडे लोकांची प्रवृत्ती असून या गोष्टींत फाजील व अवास्तव खर्च करणेंत सह-कार्यानेंच पायबंद बसावा म्हणून गांवचे लोकांनीं सुखसंपत्तिसंवर्धक सहकारी पेढी काढणेचें ठरविलें असून त्याबद्दल काम चालू करून मंजुरीस पाठविलें आहे.

येथील सहकारी पतपेढी चांगल्या तऱ्हेनें चालली असून तिचें एकंदर खेळतें भांडवल १३०००, रुपये आहे. बँकेचें कर्ज अवघें रु. ७००, असून बाकीचें सर्व भांडवल मेंबरांचेंच आहे. रिझर्व्ह फंड एकंदर रुपये ७५००, असून सोसायटीमार्फत मेंबरांना आपल्या जवळ जवळ सर्व गरजा भागवितां येतात. सवलतीचे योजनेंत या सोसायटीनें लागोपाठ चार वर्षें सवलत मिळविली. सोसायटीनें या सवलतीचे योजनेंत सरकारी खात्याकडून लागोपाठ २ वर्षें पारितोषिक मिळविलें हें गांवास भूषणावह आहे. गांवचे मंडळींनीं एक व्यायाम शाळा नवीन बांधणेची हातीं घेतली असून इतर सार्वजनिक धर्मशाळा, देवळें हीं सुव्यस्थित ठेवलेलीं आहेत. खेड ( होलेवाडी ) पासून ते खरपुडीबुद्रुक गांवापर्यंत व दावडी ( बडोदे सरकारचें गांव ) पासून ते गांवापर्यंतचा रस्ता रहदारीच्या दृष्टीनें अगदीं नालायक होता तो येथील मंडळींनी संघटित प्रयत्न करून अगदीं जुजबी मोबदला घेऊन दुरुस्त केला. गांवांतील रस्त्याच्या कडेला व इतर ठिकाणीं नवीन शोभेचीं झाडें लावणेचा उपक्रम चालू केला असून बोटॅनिकल गार्डन पुणें येथून कांहीं झाडें मागवून एकंदरींत आजपर्यंत ४० झाडें लावण्यांत आलीं आहेत, त्यामुळें गांवास एकप्रकारची शोभा येत चालली आहे.

या व अशाच प्रकारच्या अनेक सुधारणा करणेस पैशाची आतिशय अडचण येणें शक्य होतें परंतु आजपर्यंत सरकारकडून व लोकल बोर्डाकडून एकंदर ग्रँट रु. ३००, फक्त मिळाली, तरी एकंदरींत जबाबदारीचीं सर्व कामें संघटित प्रयत्नाच्या जोरावर करणेंत आलेमुळें तीं पूर्ण करतां आलीं ही गोष्ट विशेष समाधा-नाची होय. आतां गांवांत फक्त दिवाबत्तीची व शौचकुपाची सोय होणेची आहे, ती लवकरच होईल अशी आशा आहे.

या ऐकंदर माहितीवरून खरपुडी गांवचें लोकांनीं परिश्रम करून सहकार्य, आपलेपणा व चिकाटी या जोरावर किती प्रशं-सनीय ग्रामसुधारणेची कामगिरी केली हें नजरेस येईल. माजी गव्हर्नर नेक नामदार सर फ्रेडरिक साइक्स यांनीं ग्रामसुधारणेच्या कार्यास बरीच चालना दिली व जें गांव आपलें श्रमानें व स्वतःचे पायवर उभें राहून ग्रामोद्धाराचें कार्य उत्तम रीतीनें करून दाख-वील त्यास उत्तेजनाबद्दल चालेंज शील्ड देणेंत येईल असें जाहीर केलें होतें त्याचा फायदा खरपुडी बुद्रुक येथील लोकांनीं करून घेतला व सरकारनेंही येथील लोकांच्या कामगिरीबद्दल सर फ्रेडरिक साइक्स व्हिलेज इंप्रुव्हमेंट चॅलेंज शील्ड चालू सालीं त्यास देऊन योग्य गौरव केला. ( संपूर्ण )

---

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११६—१ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०२—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—५ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८—३½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०५—५ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९९—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... ... | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४९–८–० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | २९–१३ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७५—० |
| बाँबे मॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२३–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १७०–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | ११००—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४१०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दाड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०३—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९४२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७४०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८४—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४१—६ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८—२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४४००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१०–१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १५९–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | ३१२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १४९५–० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | १०८—० |

अप-टु-डेट शिलाई करतां

# महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

## परांडकर टेलर्स ॲकॅडिमी (६७२ सदाशिव पुणें २)

व

## टेलरिंग फर्म ( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां कापड व सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त तज्ञ पदवीधर व अनुभविक शिक्षकांकडून पूर्ण खात्री होईपर्यंत मिळेल.

**पाहिजेत !** खालील सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां **महाराष्ट्रांत व कर्नाटकांत** कांहीं ऑर्गनायझर व एजन्टस् पगारी कमिशनवर नेमणें आहेत.

# दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

## ( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा | **चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस,** लक्ष्मी रोड, पुणें २




## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे याद्यीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास; टिळकवाडी, पुणें २.

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult

# V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

## फर्म, कंपनी आणि सोसायटी

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं सातारचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला **"न्यायबोध"** या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टांचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा.व. ट.ख. सह फक्त ५ रु; नमुना अंकासाठी सात आण्यांचीं तिकीटें पाठवा.

मॅनेजर,
**"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.**

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.